**दिवाणी किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १६१/२०१९ मधील निशाणी ४८ वरील आदेश.**

(अनिल शिंदे वगैरे १ वि. कोणीही नाही)

(CNR No.MHSN020020782019)

अर्ज व त्यावरील म्हणणे (नि.क्र.५६) वाचले.

२. मुळ अर्ज हा मयत तुकाराम दत्तू शिंदे यांनी दिनांक २८/१०/२०२२ रोजी करुन ठेवलेल्या मृत्यूपत्राच्या आधारे व्यवस्थापत्र मिळण्याकरिता भारतीय वारसा कायदा १९२५ कलम २७८ नुसार दाखल करण्यात आलेला आहे. अर्ज प्रलंबीत असताना तिऱ्हाईत इसम यांनी निशाणी क्र. ३० वर अर्ज सादर करुन त्यांना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार म्हणुन सामिल करुन घेण्याची विनंती केली आहे. सदर अर्जावर माझे विद्वान पूर्व न्यायिक अधिकारी यांनी दिनांक ०७/०७/२०२२ रोजी आदेश पारीत करुन सदरचा अर्ज नामंजूर केला. सदर आदेशाच्या पुर्नविलोकनाकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार हे तुकाराम दत्तू शिंदे यांचे सख्खे चुलत भाऊ आहेत व मृत्यूपत्रात नमुद मिळकत हि मयत तुकाराम दत्तू शिंदे व तिऱ्हाईत इसम यांचे कुळ हक्काची मिळकत होती व सदर मिळकतीस मयत तुकाराम शिंदे यांचे नाव एकत्र कुटूंबकर्ता म्हणुन लागलेले होते. इतकेच नव्हेतर, मृत्यूपत्रावरुन व्यवस्थापत्र मिळविण्याकरिता करण्यात येणाऱ्या अर्जात मयताच्या सर्व नजिकच्या नातेवाईकांची नावे व पत्ता अर्जात नमुद करणे अपेक्षीत असते तसे न केल्यास अर्ज रद्द ही करता येतो.

४. पण येथे हे नमुद करणे गरजेचे आहे की, अद्याप मयत तुकाराम दत्तू शिंदे यांच्या मृत्यू पत्रावरुन कोणतेही व्यवस्थापत्र देण्यात आलेले नाही अथवा मूळ अर्ज मंजूर केलेला नाही. निशाणी क्र. ३० वरील माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी पारीत केलेला आदेश अर्जदार तिऱ्हाईत पक्षकारांनी आव्हानित केलेले नाही. तसेच ज्या

अर्जावरील आदेशाच्या पुर्नविलोकनाकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे, त्या अर्जात मयताच्या नातेवाईकांची नावे अर्जात नमुद करण्यात आलेली नाहीत व इतर बाबींचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे सकृतदर्शनी अर्ज निशाणी क्र. ३० वर पारीत करण्यात आलेल्या आदेशात कोणतीच सकृतदर्शनी चुक झाली असल्याचे दिसुन येत नाही.

५. इतकेच नव्हेतर जरी मुळ अर्ज मंजूर करण्यात आला तरी अर्जदारांचा सदर अर्जास आव्हानित करण्याचा अधिकार अस्तित्वात राहणार आहे. त्यामुळे अर्जदारांचा प्रस्तुत अर्जात पक्षकार म्हणुन सामिल करुन न घेतल्यास कोणतेही नुकसान संभवत नाही व माझ्या विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी अर्ज निशाणी क्र. ३० वर आदेश पारीत करत असताना त्यामध्ये केलेल्या चर्चेप्रमाणे मृत्यूपत्रावरुन व्यवस्थापत्राचा आदेश करत असताना व्यक्तीने मृत्यू पत्र योग्य पध्दतीने केले आहे किंवा नाही, त्याची शारीक व मानसिक स्थिती उत्तम असताना मृत्यूपत्र करण्यात आले होते किंवा कसे या मर्यादित बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. तसेच तिऱ्हाईत इसम या मुळ अर्जास पक्षकार नसल्याकारणाने या प्रकरणातील आदेश त्याच्यावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे आदेशात कोणतीच चुक दिसुन येत नसल्यामुळे निशाणी क्र. ३० कडील आदेशाचा पुनरविलोकन करण्याचे कारण उद्भवत नाही. सबब, उपरोक्त चर्चेवरुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो. सबब, उपरोक्त चर्चेवरुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करणे न्यायोचित होईल.

:: **आदेश** ::

अर्ज (निशाणी–४८) नामंजूर करण्यात आला.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2025.07.08 17:51:20 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. ०७/०७/२०२५ २ रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.